ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिक्षा अंतिम करणेबाबत. (श्रीम.वैशाली शंकर शिंदे, तत्कालीन , ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत-सांगवी दुमाला ता.श्रीगोंदा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/292082 /२०२५
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१००/२०२३ दि.२७/०१/२०२३.
२.या कार्यालयाकडील आदेश क्रं. साप्रवि-२/ग्रापं-३/६४०/२०२३, दिनांक- २२/०८/२०२३ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
३.सहा.आयुक्त (चौकशी),नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/ सी. आर. ४०/२०२३, दिनांक- १७/०९/२०२३, प्राप्त दिनांक ०९/१२/२०२४.
४.विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१.
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२)
६. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक डीएनई-३५९०/सीआर-१८४/२० दिनांक ८ मे १९९१.
७. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक १०९१०१५,दि.०१.०४.२०२५.
८.श्रीम वैशाली शंकर शिंदे यांनी दिलेला खुलासा दि.१६.०४.२०२५.

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये श्रीम.वैशाली शंकर शिंदे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत सांगवी दुमाला तालुका श्रीगोंदा यांना त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्रीम. वैशाली शंकर शिंदे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे गैरतर्वना विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन खाते चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| आरोप क्र. | दोषारोपाचे विवरण | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत नमुना नंबर ८ ला नोंद नसताना स्वत:चे अधिकारात लाभार्थ्यांना बोगस उतारे देऊन चुकीचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणे. | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| २ | घरकुल योजनेचा लाभार्थ्यांना दुबार लाभ देणे. | आरोप सिध्द होत नाही. |
| ३ | गट नंबर १ व ३७/२ शासकीय गायरान हददीतील जागेचे उतारे ग्रामपंचायतीची मालकी हक्क नसताना ग्रामपंचायत मालकी हक्क दाखवून बोगस दिलेले आहेत. | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| ४ | एकाच कुंटुबांतील इतर व्यक्तिंना घरकुलाचा लाभ देणे. | आरोप सिध्द होत नाही. |
| ५ | ग्रामंपचायतीचे नमुना नंबर ८ला कमी जागेची नोंद असताना घरकुल मंजुर करणेसाठी दिलेल्या उता-यावर जागेची नोंद करुन घरकुल स्वत:च्या अधिकारात मंजुरी साठी नमुना नंबर ८ चे उतारे देणे. | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| ६ | ग्रामपंचायत नमुना नंबर ८ शासकीय दस्तऐवजामध्ये खाडाखोड केलेली आहे. | आरोप अंशत: सिध्द होतो. |

| | | |
|---|---|---|
| ७ | नमुद केलेला नाही. | आरोप नमूद नाही. |
| ८ | घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे पात्र लाभार्थ्याची निवड न करणे. | आरोप सिध्द होत नाही. |
| ९ | ग्रामपंचायतीमधुन प्रशासकीय बदली होऊन सुध्दा ग्रामपंचायतीचे अर्थिक अभिलेखे अनाधिकृतपणे स्व:ताचे ताब्यात ठेवणे. | आरोप सिध्द होत नाही. |
| १० | अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांचा विकास करणे योजनेची लोंकसंख्या कमी असताना जास्त लोकसंख्येची नोंद करुन चुकीचा प्रस्ताव सादर करणे. | आरोप सिध्द होत नाही. |
| ११ | अनुसुचित जाती व नवबौध्द वस्त्यांचा विकास करणे प्रस्तावात दर्शविलेली वस्तीचे ठिकाण व व प्रत्यक्षात काम केलेले ठिकाणा मध्ये बदल केलेला आहे. | आरोप सिध्द होत नाही. |
| १२ | अनुसुचित जाती व नवबौध्द वस्ती नसताना विहमयी वस्ती येथे रक्कम रुपये २०००००/- चे रस्ता कॉक्रीटीकरणाचे काम केलेले आहे. | आरोप सिध्द होत नाही. |

वरीलप्रमाणे श्रीम.वैशाली शंकर शिंदे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचेवरं चौकशी करण्यात आलेल्या १२ दोषारोपां पैकी ०४ दोषारोप विभागीय चौकशी मध्ये अंशत: सिध्द झालेले आहेत, १२ पैकी ०७ दोषारोप सिध्द झालेले नाहीत व एक दोषारोप नमुद नाही. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमत नसल्याने श्रीम.वैशाली शंकर शिंदे यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार दोन वेतनवाढी तातपुरत्या स्वरुपात दोन वर्षासाठी रोखुन धरण्याची शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये ?, याबाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. याबाबतचा नोटीसचा खुलासा संदर्भ क्र.८ नुसार सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदरचा खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनीय आहे.

सबब, श्रीम.वैशाली शंकर शिंदे यांना देण्यात आलेल्या अंतिम कारणे दाखवा नोटीसमधील नमुद केलेली पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही, अशा रितीने दोन वर्षासाठी थोपवुन धरणे ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवापुस्तकात नमुद करुन पुढील नियमोचित कारवाई करावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१२२०६०००६ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-01-2026 15:38:30
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्रीम.वैशाली शंकर शिंदे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सांगवीदुमाला,ता.श्रीगोंदा
द्वारा व प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत,जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत
२/-सदरची अंतिम शिक्षा आदेशाची प्रत संबंधितास बजवावी व सेवापुस्तकात घेतलेल्या नोंदीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर.